# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/07/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## मोटर सायकल चोरी करणारा गुन्हेगार गजाआड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई :—

फिर्यादी नामे — देविदास नामदेव मेंढे, वय ४० वर्ष रा. उदापुर ता. रामटेक हे दि. ०८/०७/२०२३ रोजी सायंकाळी ०६/३० वा. दरम्यान नगरधन येथील पाणठेल्यावर खर्रा आणण्यासाठी गेले असता फिर्यादीने आपली मोटर सायकल पाणठेल्या जवळ ठेवली होती. फिर्यादी यांची हिरो होन्डा सिडी डिलक्स काळया रंगाची लाल पट्टे असलेली जिचा क्रमांक MH-40-H-6309 असा असुन जिचा चेचीस क्रमांक 07A23F26058 व इंजिन क्रमांक 07A22E16124 असा कोणीतरी अज्ञात चोराने नगरधन येथुन चोरून नेली आहे. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे अप क्र. ४५९/२३ कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद झाला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असतांना दिनांक ११/०७/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय खबरी मार्फत मिळालेल्या माहितीनुसार आकाश पुरी नावाच्या इसमाकडे चोरीची मोटर सायकल असल्याचे माहिती मिळाली. त्यानुसार सदर पथकाने गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस ठाणे रामटेक परिसरातुन पथकाने सापळा रचून संशयीत इसम नामे**— आकाश निरंजन पुरी, वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. १, नगरधन, ता. रामटेक, जि. नागपूर** याला ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून चोरी केलेली एक मोटर सायकल क्र. १) एक हिरो होंडा CD डिलेक्स मो. सा. क्र. MH—४०—H— ६३०९ किंमती अंदाजे २५,०००/—रुपये २) नगदी ५०००/— रुपये जप्त करून त्याच्याकडून पो.स्टे. रामटेक येथील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. पोलीस ठाणे रामटेक, नागपूर ग्रामीण १) अप. क्र. ४५९/२३ कलम ३७९ भा.द.वि. २) अप. क्र. ४५८/२३ कलम ३७९ भा.द.वि. हा गुन्हा उघडकीस आणला आहे. नमूद आरोपीची वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नायक विपीन गायधने, प्रमोद भोयर, नितेश पीपरोदे, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांनी पार पाडली.



## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बेला :-** दिनांक ०८/०७/२०२३ चे ०६.३० वा. चे सुमारास पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही दिनांक ०८/०७/२०२३ रोजी सकाळी ०६:३० वाजता नेहमीप्रमाणे ही तीच्या शाळेचे पुस्तकाची बॅग घेऊन शाळेत गेली. सायंकाळी फोन करून फिर्यादीने विचारले असता मैत्रीणीकडे थांबली आहे. उदया सकाळी येतो असे सांगीतले परंतु अद्यापपावेतो घरी आली नाही तीचा आजुबाजुचे परीसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला मिळुन आले नाही कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे मो. नं. ८९९९९१७११२ या करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. खापरखेडा :-** अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील अण्णामोड खापरखेडा देशी दारू भट्टी येथे दिनांक ११/०७/२०२३ चे १२/०० वा. ते १२/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- धर्मेंद्र लक्ष्मण चौधरी वय ३० वर्ष राहणार वार्ड क्रमांक पाच खापरखेडा याचा भाऊ हा देशी दारू भट्टीवर देशी दारूची निप आणण्याकरिता गेला असता दारू भट्टी वरील आरोपी नामे- राजू देविदास आवडे, वय ५५ वर्ष राहणार लकडगंज याला देशी दारूची नीप दे असे म्हणून पैसे दिले. त्याने देशी दारूची निप दिली परंतु पैसे परत केले नाही. फिर्यादीचे भावाने म्हटले की, तुम्ही पैसे परत करत नाही नेहमी असेच करता या कारणावरून चिडून शिवीगाळ करून आरोपीने हातात लाकडी दंडा घेऊन फिर्यादीचे भावाचे डावे पायावर व खांद्यावर मारून जखमी केले. त्यामुळे फिर्यादीने भावाला मसंद हॉस्पिटल पागलखाना चौक मानकापूर नागपूर येथे नेले तेव्हा तेव्हा तेथील डॉक्टरांनी पायाचा एक्स-रे काढून फॅक्चर असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**